# शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी

थिबा प्रासाद नजिक, रत्नागिरी - ४१५ ६१२. (महाराष्ट्र)
दूरध्वनी : ०२३५२-२२२२०३ / २२२४३५ फॅक्स : ०२३५२-२२२४३५
ई-मेल : principal_gpr@rediffmail.com वेबसाईट : www.gpratnagiri.org.in


जा.क्र. शातंर/विवि/२०२०-२१/ 2243 दिनांक : ६/९/२०२१.

**परिपत्रक :**

**विषय** :- संस्था सोडल्याचा दाखल्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अंतिम वर्ष उत्तिर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यांत येते की, या संस्थेचा संस्था सोडल्याचा दाखला मिळणेबाबतचा विनंती अर्ज दिनांक ०६/०९/२०२१ ते दिनांक १८/०९/२०२१ या कालावधीत सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० या कार्यालयीन वेळेमध्ये खालील कागदपत्रासह स्विकारले जातील.

**१) स्वःहस्तलिखित विनंती अर्ज.**
**२) छापील अर्ज (कार्यालयामधून उपलब्ध करुन दिला जाईल.)**
**३) प्रथम, व्दितीय, तृतिय वर्षांमधील प्रवेशावेळी भरलेल्या पावतीच्या झेरॉक्स**
**४) सर्व सत्राच्या गुणपत्रिकेच्या झेरॉक्स**

**इतर महत्वाच्या सुचना :**

१) विद्यार्थी स्वतः उपस्थित रहाणे व विचारलेली माहिती सांगणे अनिवार्य आहे.
२) विद्यार्थ्याने उपरोक्त अनुक्रमांकानुसार कागदपत्रे लावून कार्यालयातून अर्ज आधी तपासून घेणे.
३) अर्जामध्ये नमुद केलेल्या विभागातून **काही येणे-दणे नाही** याबाबतची सही घेणे आवश्यक राहील.
४) आवश्यकता लागल्यास या संस्थेमध्ये सादर केलेल्या जूना दाखल्याची झेरॉक्स सादर करावी लागेल.
५) विद्यार्थ्याने या संस्थेमध्ये भरलेल्या शिक्षण शुल्काच्या अनुषंगाने शिष्यवृत्तिचा अर्ज भरणे अनिवार्य आहे. तसेच शिष्यवृत्तिबाबत कार्यालयामधून काही माहिती विचारल्यास कागदपत्रे दाखवणे आवश्यक राहील.
६) जर शिक्षण शुल्क माफी घेऊन शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नसल्यास प्रती वर्षाप्रमाणे शिक्षण शुल्क वसूल केले जाईल.
७) सर्व विद्यार्थ्यांच्याकडे उपरोक्त कालावधीत अंतिम सत्राची गुणपत्रिका सोडुन सर्व (फेल, एटीकेटी, एलएसपी, पास च्या) गुणपत्रिका असणे अनिवार्य आहे. संस्था सोडल्याचा दाखला घेऊन गेलेनंतर गुणपत्रिकेबाबत संस्था जबाबदार राहणार नाही.
८) संस्थेमध्ये अंतिम सत्राच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना संस्था सोडल्याचा दाखला, अंतिम वर्षाच्या व इतर गुणपत्रिका तसेच प्रोव्हिजनल सर्टिफिकेट कार्यालयामार्फत स्वतंत्ररित्या वेळापत्रकाप्रमाणे वितरीत केले जातील.
९) संस्था सोडलेचा दाखला घेतलेनंतर स्वतः तपासून पहावा व काही त्रुटी असल्यास योग्य त्या कागदपत्रासह कार्यालयास तात्काळ अर्ज सादर करावा. उशिरा त्रुटीचा अर्ज सादर केल्यास गैरवापर केला नसलेबाबत हमीपत्र कार्यालयास सादर करावे लागेल.

**प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी**

**प्रति**:- संबंधित विद्यार्थी, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी.
**प्रत** :- १) सर्व विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी.
२) मुख्य नोटीस बोर्ड / विस्तारीत ईमारत नोटीस बोर्ड / संगणक (वेबसाईट प्रसिध्दीसाठी)